दिव्य मराठी

नाशिक. गुरुवार, २२ डिसेंबर २०१६ | ३

जागृती

सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करा

पोलिस निरीक्षक अनंत मोहिते यांचे आवाहन; मंगरूळ येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी | चांदवड

व्हॉटस्अॅप, फेसबुकसारख्या सोशल मीडियाचा वापर करून फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. गैरवापर टाळण्याबरोबरच सोशल मीडियाचा आपले जीवनमान उंचाविण्यासाठी व विकासासाठी सकारात्मकरित्या वापर करावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक अनंत मोहिते यांनी केले.

चांदवड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तालुक्यातील मंगरूळ येथे आयोजित हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विलास ढोमसे होते. व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती डॉ. आत्माराम कुंभार्डे, विजय जाधव, भीमराव निरभवणे, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर सपकाळे, संपतराव ढोमसे आदी उपस्थित होते. यावेळी विलास ढोमसे, डॉ. आत्माराम कुंभार्डे, उपप्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

शिबिर कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावालतगच्या पाझर तलावाच्या बांधाचे संपूर्ण पिचिंग केले. तलावातील १५ ट्रॅक्टर गाळ काढून बांधास लावून मुरूम व डबरचे उत्तम पिचिंग केले. शिबिरात स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, ग्रामसभेचे ग्रामविकासातील योगदान, थॅलेसेमिया आजार जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण आदी विषयांवर व्याख्याने पार पडली. सांस्कृतिक कार्यक्रमात सायंकाळी सागर साठेयांचे कीर्तन, संगीतखुर्ची, प्रश्नमंजूषा, काव्य मैफल, पथनाट्य, लावणी आदी कार्यक्रमांचे स्वयंसेवकांनी आयोजन केले होते. तसेच विविध आजार, साक्षरता व पर्यावरण संवर्धन या विषयांवर जनजागृती करण्यासाठी प्रभातफेरी काढण्यात आल्या. अर्पण ब्लड बँक नाशिक यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अहवाल वाचन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन जैन यांनी केले. प्रा. रमेश इंगोले यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. दत्ता शिंपी, प्रा. संजय खैरनार, प्रा. विजया जाधव, अर्जुन ढगे, प्रा. सारिका शिंदे, ग्रामसेवक सूर्यवंशी आदींसह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

मंगरूळ येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक अनंत मोहिते. व्यासपीठावर विलास ढोमसे, डॉ. आत्माराम कुंभार्डे, प्रा. दत्ता शिंपी, प्रा. सुरेश पाटील, प्रा. आर. जे. इंगोले आदी.

M.G.L.COMMERCE & P.H.JAIN SCIENCE COLLEGE
CHANDWAD, DIST. NASHIK

K.K.H.A.ARTS,S.M.G.L.COMMERCE & P.H.JAIN SCIENCE COLLEGE CHANDWAD, DIST. NASHIK

४ पुढारी | नाशिक, गुरुवार, २६ जानेवारी २०१७

चांदवड : तहसील कार्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीत सहभागी झालेले तहसीलदार शरद मंडलिक, पोलीस निरीक्षक अनंत मोहिते, नायब तहसीलदार रूपेश सुराणा, प्राचार्य डी. आर. बारगळ, आर. जे. इंगोले, बी. के. धायगुडे, चेतन चंदनवार आदींसह विद्यार्थी.(छाया : सुनील थोरे)

राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त चांदवडला प्रभातफेरीतून जागृती

चांदवड : वार्ताहर

राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या वतीने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.२५) मतदानाच्या जनजागृतीसाठी शहरातून प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी भीमराज दराडे, तहसीलदार शरद मंडलिक, पोलीस निरीक्षक अनंत मोहिते, नायब तहसीलदार रूपेश सुराणा, प्राचार्य डी. आर. बारगळ, आर. जे. इंगोले, तलाठी बी. के. धायगुडे, चेतन चंदनवार, दिलीप मोरे आदी उपस्थित होते.

देशातील नागरिकांनी मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाने इयत्ता ९ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांना ईव्हीएमची माहिती

मतदान प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शीपणे व्हावी, यासाठी ईव्हीएम या इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे मतदान घेण्यास सुरवात केली आहे. तरुण मतदारांना या मशीनबाबत माहिती नसल्याने मतदान करताना चुकीने दुसरे बटन दाबल्यास चुकीच्या उमेदवारास आपले मत जाते. असे होऊ नये यासाठी ईव्हीएमची माहिती नायब तहसीलदार रूपेश सुराणा, निवडणूक नायब तहसीलदार गुरव यांनी विद्यार्थ्यांना दिली.

K.K.H.A.ARTS S.M.G.L.COMMERCE & P.H.JAIN SCIENCE COLLEGE CHANDWAD, DIST. NASHIK

चांदवड महाविद्यालयाचे विशेष हिवाळी शिबिर

चांदवड : नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित आबड कला, लोढा वाणिज्य व जैन विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तालुक्यातील मंगरूळ येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिर संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी बाजार समितीचे संचालक विलास ढोमसे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चांदवडचे पोलीस निरीक्षक अनंत मोहिते, बाजार समितीचे सभापती डॉ. आत्माराम कुंभार्डे, माजी सभापती विजय पुंजाराम जाधव, भीमराव निरभवणे, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर सपकाळ, संपतराव ढोमसे आदि मान्यवर उपस्थित होते. शिबिर कालावधीत रासेयो स्वयंसेवकांनी गावालगतच्या पाझर तलावाच्या बांधाचे संपूर्ण पिचिंग केले. तलावातील १५ ट्रॅक्टर गाळ काढून बांधाला लावला. मुरूम व डबरचे उत्तम असे पिचिंग करून दिले. तसेच शिबिरात स्त्रीविकासाच्या पाऊलखुणा, ग्रामसभेचे ग्रामविकासातील योगदान, थॅलेसीमीया आजाराबाबत जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण आदि विषयांवर व्याख्याने झाली. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सायंकाळी सागरमाउली साठे यांचे कीर्तन, तर मनोरंजनात्मक कार्यक्रमात संगीतखुर्ची, प्रश्नमंजूषा, काव्यमैफल, पथनाट्य, लावणी आदिंचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विविध आजार, साक्षरता, पर्यावरण संवर्धन या विषयावर प्रभात फेरी काढण्यात आली. (वार्ताहर)

चांदवड येथील आबड-लोढा-जैन वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मंगरूळ येथे झालेल्या विशेष हिवाळी शिबिराच्या समारोपप्रसंगी अहवालवाचन करताना प्रा. नितीन जैन. समेवत प्रा. दत्ता शिंपी, प्रा. सुरेश पाटील, विलास ढोमसे, डॉ. आत्माराम कुंभार्डे, पोलीस निरीक्षक अनंत मोहिते.

आनंद नियतकालिकेस विद्यापीठाचा पुरस्कार

चांदवड : येथील आबड-लोढा-जैन वरिष्ठ व सुराणा कनिष्ठ महाविद्यालयाच्या २०१४-१५च्या आनंद नियतकालिकेस पुणे विद्यापीठाचा विभागीय स्तरावरील तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. विद्यापीठाच्या संत नामदेव सभागृहात कुलगुरू वासुदेव गाडे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पाच हजार रुपये रोख व प्रशस्तिपत्र व मानचिन्ह असे पारितोषिकाचे स्वरूप होते. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. जी. एच. जैन, डॉ. सुरेश पाटील, प्रा. डी. एन. शिंपी, प्रा.पी. व्ही. ठाकोर यांनी पुरस्कार स्वीकारला. नियतकालिकेचे संपादक प्रा. नितीन जैन, प्रा. सफुरा अन्सारी, संपादन मंडळ सदस्य श्रीमती डी. आर. जाधव, डॉ. तुषार चांदवडकर, प्रा. ए. ए. वकील, डॉ. सी. के. कुदनर, डॉ. सारिका शिंदे, डॉ. राकेश संचेती, प्रा. व्ही. डी. बागुल, प्रा. वाय. व्ही. देवरे यांनी काम बघितले.

K.K.H.A.ARTS,S.M.G.L.COMMERCE & P.H.JAIN SCIENCE COLLEGE CHANDWAD, DIST. NASHIK

चांदवड महाविद्यालयाच्या आनंद नियतकालिकेस मिळालेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुरस्कार कुलगुरू वासुदेव गाडे यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. जी. एच. जैन व सर्व प्राध्यापक वर्ग.